(CNR NO. MHNS130008952023)

नियमित दिवाणी दावा क्र. १२७/२०२३
(रफिक शेख वि. इंदुमती गरगडे व इतर )

## निशाणी क्र. २३ वर आदेश

प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी आणि त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी कथन करतात की, त्यांनी प्रतिवादीविरुध्द ठराव करुन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीचा मनाईहुकूम मिळणेसाठी सदर दावा दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ इंदुमती भानुदार गरगडे हया दि. ०२/१२/२०२४ रोजी मयत झाल्यात . त्यामुळे दाव्याचे पुढील कामकाज चालु ठेवणेसाठी न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी नं. १मयत इंदुमती भानुदास गरगडे यांचे वारस या दाव्यामध्ये रेकॉर्डवर घेणे कायदयाने गरजेचे व आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी आक्षेप नोंदविला की, सदर अर्ज योग्य व कायदेशीर नाही. प्रस्तुत नियोजीत दुरुस्ती योग्य नाही. सबब अर्ज नामंजूर करावा.

४. वादपत्राचे अवलोकन केले. वादपत्रावरुन वाद ठराव करुन मिळण्यासाठी व निरंतर ताकिदीसाठीचा आहे. प्रतिवादी क्र. १ मयत असल्याबाबत दुमत नाही. दावा गुणवतत्तेवर चालण्यासाठी प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. म्हणून प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना दाव्यात सामिल करणे न्याय्य आहे. म्हणून

खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.२३ हा मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावीत दुरुस्ती पुढील तारखेस करुन दुय्यम प्रत दाखल करावी.

**(खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषित)**

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.02.10 17:25:52 +0530

दिनांकः– १०/०२/२०२५

(पी.डी.कोळेकर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पिंपळगांव (बसवंत )